# World Cancer Day observed



PANJIM: On World Cancer Day, Manipal Hospitals as part of Manipal Health Enterprises, took a pledge to raise awareness and educate the masses on importance of early detection and the right treatment to fight cancer. Unit Head, Dr Sachin Jain, HOD Oncology Dept, Dr Shekhar Salkar and consultant radiation oncologist, Dr Shubha Jyothy were present at the ceremony, as also was Sonal Pahwa. Cancer survivors shared their experiences. A 'Pledge Tree' was also launched to signify collective fight against cancer. For this initiative Manipal Hospitals and Goa Cancer Society has joined hands to provide financial assistance for treatment of cancer patients who are residing in Goa.

# Manipal Hospitals observes 'World Cancer Day'

PANAJI: On the occasion of 'World Cancer Day', Manipal Hospitals Goa, part of Manipal Health Enterprises, took a 'pledge' to raise awareness and educate the masses about the importance of early detection and the right treatment procedures to fight this deadly disease. The event was held in the presence of unit head, Dr Sachin Jain; chief of clinical services and HOD oncology dept, Dr Shekhar Salkar and consultant radiation oncologist, Dr Shubha Jyothy. Also present were Sonal Pahwa, head market activation, Manipal Health Enterprises. NT



मणिपाल हॉस्पिटलमध्ये उपचार घेऊन बरे झालेल्या कर्करोगाच्या रुग्णांसमवेत डॉ. शेखर साळकर व मान्यवर. (छाया : तुळशीदास राऊळ)

# कर्करोगाला घाबरू नका

- डॉ. शेखर साळकर यांचे आवाहन
- कर्करोगदिनी 'मणिपाल'मध्ये कार्यक्रम

**पणजी, दि. ४ (प्रतिनिधी)**

कर्करोगाला घाबरू नका. वेळीच निदान झाल्यास कर्करोग पूर्ण बरा होऊ शकतो. प्रबळ इच्छाशक्ती व आत्मविश्वासाच्या जोरावर या रोगावर मात केली जाऊ शकते. त्यासाठी प्रत्येकाने किरकोळ दुखण्याचीही दखल घेऊन कर्करोगाचे निदान करून घेणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध कर्करोग तज्ज्ञ तथा मणिपाल गोवा हॉस्पिटलच्या वैद्यकीय सेवांचे प्रमुख डॉ. शेखर साळकर यांनी केले.

आज जागतिक कर्करोग दिनानिमित्त मणिपाल इस्पितळात कर्करोगासंदर्भात जागृती करणारा खास कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यामध्ये कर्करोगातून पूर्णपणे बरा झालेल्या मणिपाल हॉस्पिटलच्या रुग्णांनी सहभाग घेतला होता. या रुग्णांनी यावेळी अनुभवकथन केले.

या कार्यक्रमात ऑंकोलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. शेखर साळकर यांच्यासमवेत ऑंकोलॉजी रेडिएशन विभागाच्या प्रमुख डॉ. शुभा ज्योती, गोवा मणिपालचे केंद्रप्रमुख डॉ. सचिन जैन तसेच मार्केटिंग प्रमुख सोनल पाहवा उपस्थित होते.

कर्करोगासंदर्भात सर्वसामान्य लोकांमध्ये जागृती व्हावी अन् या आजारावर मात करता यावी यासाठी मणिपाल हॉस्पिटलतर्फे जागृती मोहीम हाती घेतली जाणार आहे. सर्वसामान्य लोकांनी मणिपाल इस्पितळात येऊन कर्करोगाचे निदान करावे यासाठी माफक दरात तपासणी पॅकेज उपलब्ध करण्यात आले आहे, असेही डॉ. साळकर यांनी सांगितले. गोव्यात वीस वर्षांहून अधिक काळ वास्तव्य असलेल्या व दीड लाखापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या रुग्णांना उपचारांमध्ये आर्थिक साहाय्य करण्याची तयारी मणिपाल इस्पितळाने दाखवली आहे.

या आजारातून बरे झालेल्या रुग्णांनी कर्करोगाविषयी जागृती करावी अन् लोकांना कर्करोगाची तपासणी करण्यास प्रेरणा द्यावी, असेही आवाहन आज उपस्थित डॉक्टरांनी केले. यावेळी डॉ. सचिन जैन, डॉ. शुभा ज्योती व सोनल पाहवा यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी कर्करोगाचा यशस्वी सामना केलेल्या लोकांचा सत्कार करण्यात आला.

# कर्करोगाबाबत मणिपाल इस्पितळाद्वारे जनजागृती

पणजी (न. प्र.)

जागतिक कर्करोग दिनानिमित्त काल दोनापावला येथील मणिपाल इस्पितळात कर्करोगाचे निदान व त्यावर योग्य उपचार करण्याबाबत जनतेमध्ये जागृती करण्याची शपथ घेण्यात आली. यावेळी बोलताना मणिपाल इस्पितळाच्या कर्करोग विभागाचे प्रमुख डॉ. शेखर साळकर यांनी कर्करोगाचे निदान शक्य तेवढ्या लवकर झाल्यास रुग्णांचे प्राण वाचू शकतात व त्यासाठी जागृतीची गरज असल्याचे सांगितले.

कर्करोगाचे वेळीच निदान व प्रतिबंधात्मक उपचाराचे महत्व स्पष्ट करण्याच्या उद्देशाने तसेच या रोगाविरुद्ध साऱ्यांनी एकत्र येऊन लढा देण्यासाठी मणिपाल इस्पितळ गोवाने या दिनाचे औचित्य साधून 'प्लेज ट्री' हा एक प्रतिकात्मक उपक्रम सुरू केला. यशस्वी उपचारासाठी वळीच निदान होणे महत्वाचे असते हा विचार या उपक्रमाच्या माध्यमातून सर्वसामान्यांमध्ये बिंबण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या उपक्रमाला पाठिंबा देणाऱ्यांनी रिबन लावून कर्करोगाविरोधी लढ्याची शपथ घेतली.

मणिपाल इस्पितळ आणि गोवा कॅन्सर सोसायटी यांच्या सहकार्याने आयोजित या उपक्रमाच्या माध्यमातून गोव्यातील व २० वर्षांपेक्षा जास्त काळापासून गोव्यात वास्तव्य असलेल्या व वार्षिक उत्पन्न १.५ लाख रुपयांपेक्षा कमी असलेल्या कुटुंबातील कर्करोगग्रस्त रुग्णाच्या उपचारासाठी आर्थिक साह्य केले जाणार आहे. कमी उत्पन्न गटातील रुग्णांना हे उपचार नियमितपणे करणे शक्य होत नसल्याचे आढळून आल्याने या उपक्रमातून अशा कमी उत्पन्न गटातील रुग्णांना शोधून त्यांना सर्वोत्तम उपचार सेवा देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे, असे स्पष्ट करण्यात आले.

मणिपाल इस्पितळात उपचार घेऊन कर्करोगाशी यशस्वी लढा देऊन या रोगापासून मुक्त झालेल्या काही रुग्णांनी यावेळी आपले अनुभव सांगितले. त्यात डॉ. स्वाती अणवेकर, पूनम , आरती जोग, स्मिता, इंदिरा, स्नेहर, उषा, गोपाळ आदींचा समावेश होता. त्यांना बांबूच्या झाडांची रोपटी देऊन सत्कार करण्यात आला.

'मणिपाल'तर्फे सत्कार : कर्करोगाशी यशस्वी सामना करीत सामान्य जीवन जगणाऱ्यांची यशोगाथा

# रुग्ण नव्हे फायटर!

पणजी : कर्करोगाशी यशस्वीपणे सामना करीत सर्वसामान्य माणसाप्रमाणे जीवन जगणाऱ्या मणिपाल इस्पितळाच्या काही रुग्णांनी आपण 'रुग्ण नव्हे फायटर' असल्याचे दाखवून दिले आहे. बुधवारी जागतिक कर्करोगदिनी दोनापावल येथे शुभसंकेताचे प्रतीक म्हणून या रुग्णांना इस्पितळ व्यवस्थापनातर्फे आघाडीचे कर्करोगतज्ज्ञ डॉ. शेखर साळकर यांच्या हस्ते बांबूचे रोपटे भेट देऊन सन्मान करण्यात आला.

या वेळी रुग्णांनी कथन केलेल्या अनुभवाने उपस्थित हेलावून गेले. कठीण परिस्थितीतही रोगाशी धैर्याने सामना करण्याचा संदेश या रुग्णांनी दिलेला आहे. कर्करोगाचे वेळीच निदान करण्याबाबत आणि त्यावर योग्य उपचार करण्याबाबत जनतेमध्ये जागृती करण्याची शपथ या वेळी घेण्यात आली. या वेळी मणिपाल इस्पितळ युनिट प्रमुख डॉ. सचिन जैन, कन्सल्टंट रेडिएशन ऑन्कॉलॉजिस्ट डॉ. शुभा ज्योती व मणिपाल हेल्थ एंटरप्रायझेसचे विपणन प्रमुख सोनल पाहवा उपस्थित होते.

कर्करोगाचे वेळीच निदान आणि प्रतिबंधक उपचाराचे महत्त्व स्पष्ट करण्याच्या उद्देशाने तसेच या रोगाविरुध्द एकत्रित लढा देण्यासाठी व्यवस्थापनाने इस्पितळ आवारात झाडाची लाकडी प्रतिकृती उभारून 'प्लेज ट्री' हा प्रतिकात्मक उपक्रम सुरु केला आहे. यशस्वी उपचारासाठी वेळीच निदान होणे महत्त्वाचे असते हा विचार या उपक्रमाच्या माध्यमातून लोकांमध्ये बिंबविण्याचा प्रयत्न केला जाईल. या उपक्रमाला पाठिंबा देणाऱ्यांनी प्रतिकात्मक झाडाला रिबन बांधून कर्करोगाविरुध्द लढण्याची शपथ घेतली.

**डगमगणे नाहीच**

डॉ. स्वाती हेमंत अणवेकर यांना २०१२ साली कर्करोगाचे निदान झाले. रक्तस्रावामुळे त्यांना जीवन असह्य झाले होते. शस्त्रक्रियेनंतर अत्यंत कठीण काळ गेला तरी त्या डगमगल्या नाहीत. आता त्या सामान्य माणसाप्रमाणे आहार, व्यायाम अशा सर्व गोष्टी करीत आहेत. आजारपणाच्या काळात पती, नातेवाईक, डॉक्टर यांनी आधार दिल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले.

**धैर्याने सामोरे जाण्याची ताकद**

फोंडा येथील आरती जोग हिलाही कर्करोगापासून मुक्ती मिळाली आहे. या रोगाशी लढताना आपल्याला जीवनात विश्वास मिळाला. कोणतेही संकट आल्यास धैर्याने सामोरे जाण्याची ताकद मिळाली. जीवनातील आनंदाच्या गोष्टी एन्जॉय करा आणि दुःख शेअर करा, असा संदेश तिने दिला.

**उपचारांसाठी अर्थसाहाय्य**

मणिपाल हॉस्पिटल्स गोवा आणि गोवा कॅन्सर सोसायटी यांच्या सहकार्याने आयोजित या उपक्रमाच्या माध्यमातून गोव्यामध्ये २० वर्षांहून अधिक काळ वास्तव्य असलेल्या आणि वार्षिक १.५ लाख रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबातील कर्करोगग्रस्त रुग्णांच्या उपचारासाठी आर्थिक साह्य केले जाणार आहे. सतत उपचार करत राहणे आणि महाग औषधे व उपचारांमुळे कमी उत्पन्न गटातील रुग्णांना हे उपचार नियमितपणे करणे शक्य होत नसल्याचा अनेकांचा अनुभव आहे. या उपक्रमातून अशा कमी उत्पन्न गटातील रुग्ण शोधून त्यांना सर्वोत्तम उपचारसेवा देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. महिलांना चेकअपसाठी दीड हजार रुपयांचे पॅकेज आहे.

'कर्करोगावर उपचारासाठी देशामध्ये सर्वोत्तम असलेला असा एक आमचा ऑन्कॉलॉजी विभाग आहे. कर्करोगाची तपासणी, निदान, उपचार, वेदनाशमक उपचार आणि पुनर्वसन असे विविध प्रकारचे उपचार या विभागात केले जातात,' असा दावा मणिपाल हॉस्पिटल्सचे युनिट प्रमुख डॉ. सचिन जैन यांनी मांडला. 'जागृती, जाणीव होणे हे कर्करोगावर एक प्रभावी औषध आहे. वेळीच निदान होणे आणि या आजाराची सर्व माहिती मिळणे यामुळे कर्करोगावर वेळीच प्रभावी व यशस्वी उपचार करणे शक्य होते,' अशी माहिती साळकर यांनी दिली.

(प्रतिनिधी)



कर्करोगाशी यशस्वी दोन हात करून सामान्यांप्रमाणे जीवन जगणाऱ्या रुग्णांचा सत्कार करण्यात आला.

## 'हॅपी गो लकी'!

वास्को येथील राम नाडकर्णी हे गृहस्थ यकृताच्या कर्करोगाने आजारी असूनही 'हॅपी गो लकी' जीवन जगत आहेत. त्यांच्या धैर्याबद्दल कौतुक करावे तेवढे थोडेच. नाडकर्णी हे सामान्य माणसाप्रमाणे जीवन जगतात. ते बँकॉक दौराही करून आलेले आहेत. दीड वर्षांपूर्वी निदान झाल्यानंतर त्यांनी झटपट उपचार घेतले. दुर्धर रोगाचे निदान झाले तरी माणसाने हातपाय गाळू नये. नेहमी सकारात्मक विचार करावा, असा संदेश ते देतात.

## नियमित चेकअप



वास्को येथील श्रीमती इंदिरा डिसिल्वा या वृध्द महिलेनेही आपले मनोगत व्यक्त केले. २०११ साली त्यांना कर्करोगाचे निदान झाले. सुरुवातीला दुखण्याकडे दुर्लक्ष केले; परंतु निदान झाल्यानंतर ३ फेब्रुवारी २०१२ रोजी मणिपाल इस्पितळात शस्त्रक्रिया केली आणि ती यशस्वीही झाली. आता आपण नियमित जीवन जगत आहे. गेली तीन वर्षे नियमितपणे चेकअपसाठी येते, असे त्या म्हणाल्या.

## अन् त्यांच्या भावनांचा बांध फुटला!

मडगाव येथील श्रीमती पूनम चंदवानी या बँकेत अधिकारी असलेल्या महिलेला या वेळी आपल्या भावना व्यक्त करताना अश्रू अनावर झाले. २००७ साली त्यांना कर्करोगाने ग्रासल्याचे निदान झाले तेव्हापासून त्या उपचार घेत आहेत आणि वेळीच निदान झाल्याने त्यांच्या जिवाचा धोकाही टळला आहे. डॉ. साळकर हे आपल्यासाठी देवासारखे असल्याचे त्या म्हणाल्या. पूनम यांना नेहमीच कामाची चिंता असायची. नोकरी, धंद्यात स्वतःला वाहून घेताना प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका, असा सल्ला या वेळी डॉ. साळकर यांनी दिला.